# 'कोटा'तील 'आयआयटीयन्स' सांगलीत

## ३५ लाखांचे पॅकेज डावलून विट्याच्या प्रा. शिरीष कुंभार यांचा जिद्दीचा 'प्रयास'

**सकाळ वृत्तसेवा**

सांगली, ता. १७ : उत्तराखंडमधील आयआयटी रुरकीमधील पदवीनंतर कार्पोरेट उद्योग क्षेत्रातील अनेक संधींना नाकारत थेट सांगलीत क्लास घेण्यासाठी आलेल्या शिरीष कुंभार यांचा प्रवास नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असाच आहे. काही काळ खासगी क्लास सेंटर्सचे हब असलेल्या राजस्थानमधील कोटामधील प्रसिद्ध अशा क्लासेसमध्ये ते शिकवत होते. मात्र तिथं सांगलीतून आलेल्या मुलांनी त्यांना 'गावाकडं या' अशी घातलेली साद ऐकून तिथले ३५ लाखांचे पॅकेज नाकारून ते सांगलीत आले. वयाच्या तिशीत त्यांनी सांगलीतून आयआयटीयन्स घडवण्याचा संकल्प एका आटणी कामगाराच्या मुलाने केला आहे.



प्रा.शिरीष कुंभार

खरं तर देशभरातील 'आयआयटीयन्स' चर्चेत येतात ते त्यांना मिळणाऱ्या गलेलठ्ठ पॅकेजमुळे. रुरकी आयआयटीमधून ते २०१५ मध्ये पदवी घेऊन बाहेर पडले. त्यानंतर शिरीष यांनाही अनेक कार्पोरेट संधी चालून आल्या. मात्र शिक्षकच व्हायचं या इराद्याने त्यांनी राजस्थानमधील क्लासेसची पंढरी कोटाकडे धाव घेतली. या प्रवासाबद्दल ते म्हणाले, ''महाविद्यालयातील 'एनएसएस'त सक्रियतेमुळे शिक्षक व्हायचं स्वप्न पाहिले. पदवीनंतर कोटा गाठले. तिथल्या टॉप दोन क्लासेसमध्ये सलग सहा वर्षे अध्यापन केले. तिथे दरवर्षी ३५ लाखांपर्यंतची पॅकेज मिळाली. तिथे देशभरातून दरवर्षी दोन लाखांवर विद्यार्थी जेईई व नीट परीक्षांच्या तयारीसाठी यायचे त्यातून तिथले अर्थकारण लक्षात यावे. तिथल्या क्लासेसच्या गर्दीत सांगली जिल्ह्यातून आलेल्या काही विद्यार्थ्यांनी-पालकांनी तुम्ही सांगलीत का येत नाही अशी विनंती केली. आणि मग वर्षभरापूर्वी मी सांगलीत यायचा निर्णय केला. खरे तर माझे वडील विटा सोडून आटणी व्यवसायासाठी लहानपणापासून राजस्थानला स्थायिक झालेले. मात्र अलीकडे ते गावी परतले. सध्या वडील जयवंत आणि आई सिंधुताई विट्यामध्येच स्थायिक आहेत. त्यामुळे मी सांगलीत येतोय याचा त्यांना कोण आनंद झाला.''

ते म्हणाले, ''सांगलीत आल्यानंतर युनीक अकॅडमीच्या प्रा. नारायण उंटवाले यांनी त्यांना सहकार्याचा हात दिला. त्यांच्यासोबत त्यांनी 'प्रयास अकॅडमी' सुरू केली. महापूर, कोरोना अशा संकटाच्या मालिकेत वर्षभरापूर्वी सुरू केलेसा 'प्रयास' आता आकाराला येत आहे. मला समाजाच्या सर्व स्तरातील मुले क्लासला यावीत असे अपेक्षित आहे. त्यासाठी गतवर्षी कोरोनामध्ये आई किंवा पालक गमावलेल्या मुलांना मोफत शिकवण्याचा निर्णय केला. यावर्षीही अशा कुटुंबातील मुलांसाठी ही योजना कायम असेल. 'बार्टी'च्या मदतीने अनुसूचित जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांसाठीही मोफत सुविधा दिल्या. सर्व स्तरातील विद्यार्थी येत आहेत. माझ्या या धडपडीत प्रा.उंटवाले यांच्या प्रेरणेबरोबर एनआयटीमधील मुरारी लववंशी, आयआयटी कानपूरचे डॉ. अख्तर अली यांच्यासह सातहून अधिक शिक्षक यांचाही सहभाग आहे. प्रा. उंटवाले सरांना अध्यापन क्षेत्रात गेल्या ३० वर्षांपासून मार्गदर्शनाचा अनुभव आहे. कोटामध्ये असतानाही माझे